रविवार दि.१५ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com   Lokneta News - लोकनेता न्युज   8459977904   epaper.lokneta.in

# दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा:जनतेला सुखाने नांदू द्या

## रोहित पवार यांचा छगन भुजबळ यांच्यावर पलटवार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मराठा आंदोलनासंबंधी मंत्री छगन भुजबळ यांनी केलेले आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत. छगन भुजबळ यांनी दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवावा आणि महाराष्ट्रातील जनतेला सुखाने नांदू द्यावे, असे ते म्हणालेत.

छगन भुजबळ यांनी शरद पवार गटाच्या रोहित पवार व राजेश टोपे या दोन आमदारांवर मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला खतपाणी घातल्याचा आरोप केला होता. छगन भुजबळ म्हणाले होते की, आंतरवाली सराटीत दगडफेक व लाठीचार्जची घटना घडल्यानंतर मनोज जरांगे आंदोलन सोडून आपल्या घरी जाऊन झोपले होते. पण रोहित पवार व राजेश टोपे या दोघांनी मध्यरात्री २ वाजता तिथे जाऊन त्यांना पुन्हा आंदोलनस्थळी आणून बसवले.

त्यानंतर शरद पवार यांना तिथे नेले. त्यानंतर उद्धव ठाकरेही तिथे गेले. पवार व ठाकरे या दोघांनाही खरी वस्तुस्थिती माहिती नव्हती. हे दोन्ही नेते गेल्यामुळे लाठीचार्जची घटना मोठ्या लोकसंख्येपर्यंत पोहोचली. त्याचा फायदा मनोज जरांगेंना झाला. या संपूर्ण घटनेत या दोघांचा हात आहे असा तेथील लोकांचा आरोप आहे, असे छगन भुजबळ म्हणाले होते.

छगन भुजबळ यांच्या या आरोपांनंतर रोहित पवार यांनी एका विस्तृत पोस्टद्वारे त्यांच्यावर पलटवार केला. ते म्हणाले की, आदरणीय भुजबळ साहेब, सामाजिक प्रश्नासाठी सामाजिक कार्यकर्ता लढत असताना राजकीय आरोप करून सामजिक कार्यकर्त्याची बदनामी करणे आपल्या सारख्या जेष्ठ नेत्याला शोभत नाही. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर २ सप्टेंबर रोजी सरकारने अमानुष लाठीचार्ज केल्याने त्या भागात नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण होते. त्यामुळे मी स्वतः रात्री अडीच वाजता जाऊन त्या भागातील हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली. धीर दिला. जरांगे पाटील यांच्या कुटुंबाला धीर दिला, यात चुकीचे काय आहे का?ओबीसींचे राजकीय आरक्षण संपवणाऱ्या भाजपला टोकाचा विरोध करणारा आपल्यासारखा जेष्ठ नेता आज माझ्यावर तसेच राजेश टोपे साहेबांवर 'ज्यांच्या सांगण्यावरून आरोप करत आहेत त्याच नेत्याच्या' हातात आज गृहमंत्रालय आहे. त्यामुळे त्यांना सांगून माझ्यावरील आपण केलेले आरोप सिद्ध करून माझ्यावर कायदेशीर कारवाई करायला सांगा, हे माझे आपणास जाहीर आव्हान आहे.असो! हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. त्यामुळे दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा आणि महाराष्ट्राच्या जनतेला सुखाने नांदू द्या तसेच भाजप नेत्यांच्या नादाला लागून महाराष्ट्राची वाट लावण्यापेक्षा जनतेच्या खऱ्या समस्यांकडे लक्ष द्या, ही विनंती, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# श्रीगोंदा वि.वि.का.सेवा सोसायटीच्या चेअरमन पदी पोपट कोथींबीरे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन अशोकबापु आळेकर यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर अध्यासी अधिकारी श्री. एन. बी. मुंढे, यांचे अध्यक्षतेखाली सहायक निबंधक सहकारी संस्था श्रीगोंदा यांचे कार्यालयात चेअरमन निवड पार पडली चेअरमन पदासाठी श्री पोपट दत्तु कोथींबिरे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल दाखल झाले. त्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून श्री.भिमराव बाबुराव आनंदकर व अनुमोदक म्हणून श्री.मोहन हरीभाऊ डांगरे



यांच्या सहयांचे श्री.पोपट दत्तु कोथींबिरे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने निवडणुक निर्णय अधिकारी श्री.एन.बी.मुंढे यांनी श्रीगोंदा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमन पदी श्री. पोपट दत्तू कोथिंबीरे यांची अविरोध निवड केल्याचे जाहीर केले.

त्यांना सहाय्यक म्हणून सेवा संस्थेचे सचिव श्री. राजूशेठ सिदनकर व मॅनेजर भाऊसाहेब सिदनकर यांनी कामकाज पाहिले.

सभेनंतर भिमराव आनंदकर, सुभाष बोरुडे, सुनिल बोरुडे, मोहन डांगरे ,ज्योती खेतमाळीस, मंदाकिनी वडवकर, सखाराम औटी ,अनिल ननवरे, हनुमंत उदमले या उपस्थित संचालकांसह मावळते चेअरमन अशोकबापु आळेकर यांनी नुतन चेअरमन यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# प्रभावी भाषण शिका भाषण कला सर्वांसाठी खूप सोपी व्हावी म्हणून अनोखे उपक्रम राबवून

## ह.भ.प.ज्ञानेश्वर कवडे महाराज यांनी विवेकानंद कडमीच्या वतीने अनेक वक्ते घडविले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



प्रभावी भाषण शिका'चा नगरमध्ये फ्री सेमिनार नगर - स्टेजची भीती पूर्णतः जावी,प्रचंड आत्मविश्वास वाढावा,व्यक्तिमत्त्व विकास घडावा,भाषणाचा भरपूर सराव व्हावा आणि भाषण कला सर्वांसाठी खूप सोपी व्हावी, यासाठी विवेकानंद कॅडमीच्या वतीने नगर शहरात मागील १५ वर्षांपासून वर्कशॉप घेतले जातात.खात्रीशीर प्रॅक्टीकल मोफत सेमिनार रविवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नगरमधील नागापूर येथील एमसीसीआयए ट्रेनिंग हॉल,सह्याद्री चौक,पोस्ट ऑफिस शेजारी येथे संपन्न होईल.तुम्ही खात्रीशीरपणे भाषण शिकण्याची कला कॅडमीच्या माध्यमातून अवगत करू शकता,असे संचालक ह.भ.प.ज्ञानेश्वर कवडे महाराज 'सर' यांनी विवेकानंद कडमी च्यावतीने अनेक वक्ते घडविले सांगितले.अधिक माहितीसाठी ७०३०४५१३३३ या मोबाईलवर संपर्क साधावा.

आतापर्यंत कवडेसरांनी अनेक वक्ते घडविले असून,अनेकजण विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत.ते उत्तमप्रकारे भाषण करून मंच गाजवत आहेत.हे सेमिनार मोफत असून,यामध्ये सर्व वयोगटातील महिला व पुरुषांना सहभागी होता येईल.ज्यांना भाषण शिकण्याची कला अवगत करायची आहे.त्यांनी या फ्री सेमिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुष्पावतीतील गणरायाला ढोल ताशांच्या गजरात निरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**डिंगोरे । मयूर ढोबळे**

येथील ग्रामविकास मंडळ, ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरे शाळेतील गणरायाला ढोल ताशांच्या गजरात अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात निरोप दिल्याची माहिती मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली.आगमनापासून विसर्जनापर्यंत विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आज अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात विसर्जन मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी झेंडा पथक, लेझिम पथक,झांज पथक,तीन पावली पथक, मंगळागौर पथक, दहीहंडी पथक इत्यादी अनेक पथकांचे सादरीकरण केले.विद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी जगन्नाथ गाढवे , विठ्ठल शितोळे, किसन भुतांबरे,



मंगेश कोंडार,रतिलाल बागुल,वैभव देशमुख, दिनेश पाटील, दत्तात्रय घोलप,विजय काकडे,सौ.साधना तांबे, शिल्पा भालेराव,सिंधू कोल्हार, मंगेश डुब्रे, रेवजी दुधवडे, शिवाजी उकिरडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.संस्थेचे अध्यक्ष श्री अनिलशेठ तांबे संस्थेचे सर्व सदस्य, डिंगोरे गावच्या सरपंच सौ सीमा सोनवणे व सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

# चारठाणा येथील आश्रम शाळेने मैदानी स्पर्धेत जिंतूर येथे मैदान गाजविले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चारठाणा । श्रीपाद जोशी**

दि.१३ सप्टेंबर २०२४ रोजी जिंतूर येथे शालेय मैदानी स्पर्धा पार पडल्या या मैदानी स्पर्धेत कै. उत्तमराव जोगवाडकर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी मैदान दणाणून टाकले या स्पर्धेत १४ वर्षे खालील वयोगटात ६०० मीटर धावणेमध्ये अभिषेक जाधव तालुक्यातून प्रथम. २०० मीटर धावणे मध्ये अभिषेक जाधव तालुक्यातून प्रथम १०० मीटर धावणे मध्ये अभिषेक जाधव तालुक्यात प्रथम तसेच ६०० मीटर धावणे



मध्ये सागर पवार तालुक्यातून द्वितीय २०० मीटर धावणे मध्ये सागर पवार तालुक्यातून द्वितीय ८०मी .हार्डलेस मध्ये गणेश शिंगारे द्वितीय १७ वर्षे वयोगटातील ४०० मीटर हार्डलेस मध्ये शुभम चव्हाण तालुक्यातून प्रथम १५०० मीटर धावणे शुभम चव्हाण तालुक्यातून द्वितीय १५०० मिटर हार्डलेस महेश राठोड द्वितीय.भालाफेक मध्ये मनोज जाधव तृतीय १९ वर्षे वयोगटातील ४००मी हार्ड लेस राठोड दीपक प्रथम ३००० हार्डलेस मध्ये राठोड दीपक द्वितीय ११० हार्डलेस युवराज राठोड तालुक्यातून प्रथम ४०० मीटर धावणे मध्ये योगेश राठोड तृतीय ट्रिपल जम्प मध्ये दीपक राठोड तालुक्यातून प्रथम रिले ४ ४०० तालुक्यातून प्रथम( १) राठोड दीपक(२) घुले चैतन्य (३)कृष्णा जाधव(३) युवराज राठोड( ५)योगेश राठोड या सर्व विद्यार्थ्यांनी व मार्गदर्शक गजानन सोर यांनी नेत्र दीपक कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री शशिकांत दादा देशपांडे सचिव श्री विजयराव कान्हेकर परभणी (इ.मा.ब.क.) विभागाच्या सहाय्यक संचालक श्रीमती गीता गुट्टे मॅडम निरीक्षक तुकारामजी भराड तसेच गटशिक्षणाधिकारी त्रिंबक पोले प्राचार्य श्री तुळशीराम पालवे विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.



मा श्री गजाननराव टेकाळे साहेब यांची जिल्हा पुरवठा अधिकारी वी नवीन नियुक्ती झाले बदल सत्कार करताना भगवान कोकाटे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार स्वस्त धान्य दुकानदार संघटना अध्यक्ष लोणार सरपंच टिटवी बीरसां क्रांती दल जिल्हा अध्यक्ष बुलढाणा.

# लग्नासाठी मुली आहेत असे सांगून माहेर संस्थेच्या नावाने फसवणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

माहेर संस्था जी निराधारचा आधार,गरजूवंताची गरज आणि अनाथाचे घर म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर या संस्थेचे कार्य चालते. या संस्थेच्या संस्थापिका सिस्टर लुसी कुरियन २०१५ च्या राष्ट्रपती च्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार मानकरी आहेत. त्यांच्या कार्याची दखल परदेशातही घेतल्या गेलीय.बाहेर देशातूनही त्यांच्या कार्यासाठी पुरस्कृत करण्यात आले आहे.जे आज अनाथ, निराधार यांना सांभाळण्याच काम करतात त्याचबरोबर बेघरांना आधार देण्याचे काम करतात अशा या संस्थेच्या वेबसाईटवरून फेसबुक पेजवरून फोटो घेऊन परस्पर मध्यमवर्गीय कुटुंबांना संपर्क साधून लग्नासाठी मुली आहेत. आम्ही माहेर संस्थेतून बोलत आहोत.असे सांगून पाच ते दहा हजार रुपयाची फसवणूक केली जाते. आणि सदरील व्यक्ती हा माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसी दीदी यांच्या फोटो तसेच संस्थेतील इतर उपक्रमाचे फोटो एडिट करून पुढील व्यक्तीला दाखवतो की मी याच संस्थेचा एक पदाधिकारी आहे असे निदर्शनास आले असता माहेर संस्थेने सदर विषय वडगाव शेरी पोलीस चौकी तसेच शिक्रापूर पोलीस चौकी येथे रीतसर तक्रार नोंद केली आहे.तरी अशी गोष्ट पुन्हा आपल्या निदर्शनास आल्यास माहेर संस्थेत कळवावे असे संस्थेकडून कळवण्यात आले आहे. अशा पैसे मागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा माहेरशी संबंध नसून सतर्क राहावे.. आणि अशी कोणतीही व्यक्ती आढळल्यास माहेर संस्थेच्या श्री रमेश चौधरी सर ९०११५ ९४७५७ यांच्याशी संपर्क साधावे..असे आवाहन केले आहे.

# ग्राहक रक्षण समिती विदर्भ अध्यक्ष पदी पत्रकार सचिन खंडारे यांची निवड

## ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी समिती तत्पर-सचिन खंडारे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । प्रतिनिधी**



बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असणारे रोखठोक पत्रकार सचिन मधुकर खंडारे यांची भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षण समितीच्या विदर्भ अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे,सदर निवडीचे पत्र राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष डॉ सौ . आशाताई पाटील ,यांनी दिनांक १४ सप्टेंबर रोजी दिली आहे,सदर शिफारस महाराष्ट्र मीडिया प्रमुख राजेंद्र लहाने यांनी केली असून बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्राहक समितीमार्फत लवकरच भव्य दिव्य मेळावा घेणार असल्याचे यावेळी सचिन खंडारे यांनी सांगितले, ज्या ज्या ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होते उदा . किराणा दुकान मेवा ड दुकान इतर ठिकाणी ग्राहकाचे फसणूक होत असेल अशा ठिकाणी ग्राहकांना मार्गदर्शन करून योग्य ती न्याय त्यांना मिळून देण्यासाठी सदर समिती काम करत असते, सचिन खंडारे हे नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात त्यांची निवड झाल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्राहक रक्षण समितीमार्फत ग्राहकांना मोठा न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे त्यांची निवड झाल्याबद्दल बुलढाणा जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# संदीप भाऊ मोरे एक खरा समाजसेवक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**



वंचित बहुजन आघाडी प्रभाग क्रमांक - ४ चे अध्यक्ष संदीप भाऊ मोरे , एक तळागाळातील व गरीब जनतेच्या विविध समस्या सोडवण्यासाठी अविरतपणे काम करणारा एक खरा समाजसेवक म्हणून ओळखला जातोय.वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर साहेब व पुणे शहर उपाध्यक्ष श्री.हिरामण भाऊ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडी वाघोली प्रभाग क्रमांक - ४ चे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष एक उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

वाघोली गावातील बऱ्याच गोष्टींची सुधारणा व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी संदीप भाऊ मोरे यांनी अविरतपणे कार्य केले. सामान्य जनतेचे विविध प्रश्न असतील , जनतेवर होणारा अन्याय अत्याचार असेल , सामाजिक काही अडी अडचणी असतील तर सगळ्यांच्या मदतीला धावून येणारा एक समाजसेवक म्हणून संदीप भाऊ मोरे यांच्याकडे पाहिलं जात आहे.

## चारोळी

भुरळ पडेल काही क्षणाची
पारखून तू पाऊल टाक
भेटेल जिथे अमृतवाणी
तिथे मात्र नम्रपणे वाक.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# पक्षाचा अध्यक्ष झाला म्हणून कुणी साहेब होत नाही:शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांची अजित पवारांवर टीका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरुर (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात केवळ दोनच साहेब आहेत. एक शरद पवार पवार आणि दुसरे बाळासाहेब ठाकरे. आमची पिढी या दोघांनाच साहेब मानते. त्यामुळे एखाद्या पक्षाचा अध्यक्ष झाला म्हणून कुणी साहेब होत नाही, अशी जळजळीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधताना केली आहे.

अजित पवार यांनी खेड आळंदी येथील एका कार्यक्रमात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांना लालदिव्याची गाडी देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच आता आपणच साहेब असल्याची मिश्किल टिप्पणीही केली होती त्यांच्या या टीप्पणीचा संदर्भ देत अमोल कोल्हे यांनी शुक्रवारी त्यांच्यावर निशाणा साधला.

अमोल कोल्हे म्हणाले की, महाराष्ट्रात दोनच साहेब आहेत. एक शरद पवार आणि दुसरे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे. आमची पीढी या दोघांनाच साहेब म्हणते. केवळ एखाद्या पक्षाचा अध्यक्ष होणे म्हणजे साहेब होणे नाही. त्यासाठीचा सांस्कृतिक व्यासंग असेल, सामाजिक व्यासंग असेल, दुसऱ्याच्या नव्हे तर स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहणे असेल किंवा संकट आल्यानंतर पळून न जाता संकटाला छातीवर झेलणे म्हणजे पवारसाहेब असणे आहे. हे माझ्यासारख्या लहान कार्यकर्त्याने अजितदादांना सांगण्याची गरज नाही.अजित पवार यांनी गुरुवारी तीर्थक्षेत्र आळंदीसह खेड तालुक्यातील आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या जनसंवाद दौऱ्याला हजेरी लावली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, महायुतीच्या जागावाटपात खेड आळंदीची जागा राष्ट्रवादीला सुटली तर पुन्हा दिलीप मोहिते पाटलांना निवडून द्या. त्यांची गाडी ग्रामपंचायतीपासून आमदारपदापर्यंत पोहोचली आहे. आता लालदिव्यापर्यंत गाडी पोहोचवण्यासाठी साथ द्या. दिलीप मोहितेंना आमदार करा. खेड आळंदीला लाल दिव्याची गाडी देतो. आता आपल्याला दुसऱ्या कुणालाही सांगण्याची गरज नाही. आता आपणच साहेब आहोत.उल्लेखनीय बाब म्हणजे अमोल कोल्हे यांनी मंगळवारीच अजित पवार यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. अजित पवार गटाची अवस्था सध्या येऊ नको म्हटले तरी कोणत्या गाडीत बसू अशी झाल्याची टीका त्यांनी केली होती. महायुतीच्या सर्व्हेमध्ये अजित पवारांना केवळ १२ जागा मिळतील असे सांगितले जात आहे. त्यामुळे उर्वरित २८ आमदारांचे करायचे काय? असा प्रश्न त्यांच्यापुढे उपस्थित झाल्यामुळे दादांनी बिहार पॅटर्ननुसार भाजपकडे मुख्यमंत्रीपदाची मागणी केली असेल, असे अमोल कोल्हे म्हणाले होते.



# नांदुरा पोलिसांची धडक कारवाई दोन मोटरसायकल चोरट्याना अटक



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदुरा । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन नांदुरा पोलीस निरीक्षक विलास पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्यात २आरोपीताना अटक मोटारसायकल जप्त २ दिवसांचा पीसीआर

पोलीस स्टेशन नांदुरा येथें दि २.जुलै २०२४ रोजी फिर्यादी जयप्रभु शंकर भगत रा कोकळवाडी ता. नांदुरा यांची मोटारसायकल बजाज प्लेटीना एम एच २८ बीपी ६४४८ किमत ३५००० रुपयांची अज्ञात आरोपीनी चोरी करून नेल्याचे तक्रारी वरून चोरीचा गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता सदर गुन्ह्यात काल २ आरोपीताना अटक करण्यात आली त्यात राजू मंगळ जगताप २८ रा बेलाड ता. मलकापूर

श्रावण देवसिंग भोसले ३० रा. हलखेडा रा मुक्ताईनगर यांना काल अटक करून सदर मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या व आरोपीताचा २ दिवसांचा पी सी आर घेण्यात आलेला अजून चोरीच्या मोटार सायकल हस्तगत करण्याचे काम तपास अधिकारी पो अंमलदार संजय निंबोलकर व विक्रमसिंग राजपूत हे करीत आहेत.

# पिक विमा तात्काळ देण्याची मागणी

## जय सेवालाल बहुजन विकास पार्टीचे थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क । **मंठा । प्रतिनिधी**

साल सन २०२३- २४ मधील प्रलंबित पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्याची मागणी जय सेवालाल बहुजन विकास पार्टीच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.निवेदनात जय सेवालाल बहुजन विकास पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीराम जाधव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,साल सन २०२३ - २४ मध्ये मंठा तालुक्यात सुरुवातीला पावसाने उघाड दिली होती.मात्र परतीच्या एकाच पावसाने तालुक्यातील शेतकऱ्यांची हाता तोंडाशी आलेली पिके अतिवृष्टीने नष्ट झाली होती.शेतात जागोजागी पाणी साचले होते त्यामुळे शेतकऱ्याने पिक विमा कंपनीकडे वेळेत तक्रार नोंदवून नुकसान झाल्याची माहिती दिली होती. त्यावेळी अवकाळी ग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून मंजूर करण्यात आले पिकविमा बाबतचे ८००० कोटी रुपये मंजूर करण्यात आली मात्र याबाबत वाटपाची कारवाई अद्याप पर्यंत झालेली नाही. याशिवाय शासनाने प्रत्येक अनुदान,विमा,इत्यादी योजने साठी लागू केलेली केवायसी करण्याची आट तात्काळ रद्द करण्यात येऊ शेतकऱ्यांना पिक विमाचे वाटप करावे असे शेवटी म्हटले आहे.

# आर एम धारिवाल शाळेत १४ सप्टेंबर हिंदी दिन उत्साहात साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

शिरूर येथील आर एम धारीवाल इंग्लिश मीडियम शाळेत १४ सप्टेंबर हा दिवस हिंदी दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असल्याची माहिती प्राचार्या अश्विनी घारू यांनी दिली. हिंदी भाषेचा प्रसार व प्रचारास चालना मिळावी व ह्या भाषेचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी विद्यालयात वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये हिंदी कविता, भाषणे, दोहे, गजल, इ. यातून गोरक्ष वर्मा, जयेश गावडे, गौरी ताकवणे, श्रुती खंदारे, काव्या शेळके, फिरदोस सय्यद, अनिकेत रोडगे, इ. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख रवी कुरुंदळे, रेखा कदम आणि अर्चना गुंजाळ या हिंदी विषयाच्या शिक्षकांनी हा कार्यक्रम करण्यास विशेष परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्य अश्विनी घारू यांनी हिंदी दिनाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष अनिल बोरा, संस्थेचे सचिव नंदकुमार निकम, सदस्य धरमचंदजी फुलफगर यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी पर्यवेक्षिका राजेश्वरी नायर, अपर्णा वाळसे, तृप्ती आगळे, आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेखा कदम यांनी केले. सूत्रसंचालन जयेश गावडे या विद्यार्थ्यांनी केले. तर आभार अर्चना गुंजाळ यांनी मानले.

# जन शिक्षण संस्थान बीड येथे स्वच्छता पंधरवड्याचे उद्घाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**




दिनांक १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा आयोजित स्वच्छता पंधरवाडा या कार्यक्रमाचे उद्घाटन जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांच्या मार्गदर्शना नुसार करण्यात आले.

दीनदयाल शोध संस्थान चक्रधर नगर पांगरी रोड बीड येथील परिसर स्वच्छता करून परिसर स्वच्छता याविषयी जन शिक्षण संस्थांनचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर परिसर स्वच्छते बद्दल माहिती देताना म्हणाले की, आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच परिसर स्वच्छता चांगली असणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी आपण राहतो, काम करतो तो परिसर स्वच्छ व सुंदर असला पाहिजे. परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. कचरा कुंडीतच टाकून त्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे. आपण आपल्याबरोबरच इतरांची सुद्धा काळजी घेतली पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

दैनिक लोकप्रभाचे उपसंपादक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री नितीन जी क्षीरसागर यांनी जन शिक्षण संस्थान द्वारा विविध कौशल्य विषयक प्रशिक्षणाची गंगा बीड जिल्ह्यात आणली असून अतिशय कमी शुल्क मध्ये तर एससी, एसटी ,दिव्यांग, विधवा ,परित्याकत्या महिलांना निशुल्क प्रशिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचे महत्त्वाचे कार्य केले जात असल्याचे सांगितले.सूत्रसंचलन व प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ स्वातीताई जैन यांनी केले. यावेळी त्यांनी दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थानच्या कार्याची माहिती देऊन संस्थान द्वारा समाज उपयोगी केल्या जाणाऱ्या कार्याची ही माहिती दिली.

कार्यक्रमासाठी नाभिक समाज महामंडळाचे बीड जिल्हा अध्यक्ष श्री विशाल जी वाघमारे, सौ स्नेहलताई केवडकर, सौ सुमेधाताई मनसबदार, याबरोबरच ६५ युवक युवती यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गणेश गुरखुदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप नेते तथा नगरसेवक जगदीश भैय्या गुरखुदे यांचे पुतणे गणेश गुरखुदे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. द्वारकाधीश मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष परशुराम भैया गुरखुदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. द्वारकाधीश मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले तसेच पाली पासून जवळ असलेल्या इन्फंट इंडिया मधील मुलांना उपहार तसेच पावभाजीचे जेवण देण्यात आले. तसेच पसायदान सेवा प्रकल्प येथे देखील गरजूंना चपला व जेवण देण्यात आले. तसेच प्रकल्पातील लाभार्थ्यांसोबत मित्र मंडळ यांनी देखील जेवणाचा आस्वाद घेतला. अनाथांचा नाथ गणेश गूरखुदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध उपक्रम राबविण्यात आले. जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र बीड येथे जेवणाचा कार्यक्रम. सार्थक सिद्धी गो-शाळा येथे भूमी पूजा. पसायदान सेवा प्रकल्प येथे सुद्धा जेवणाचा कार्यक्रम व पादत्राणे वाटप. इन्फंट इंडिया पाली येथे जेवणाचा कार्यक्रम. जिल्हा रुग्णालय बीड येथे फळ वाटप असे विविध कार्यक्रम घेतले या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे यावेळी योगेश शेनकुडे अभिषेक काळे सुरज दहिवाळ तन्मय पवार यश जावळे आदेश गायकवाड मयूर शिंदे अनिकेत भंडारी राजू भोसले गौरव वाजपायी कृष्णा राऊत महेश गिरी शैलेश गिरी आतिश अंधारे आदींची उपस्थिती होती.

# कै.सुभाष आण्णा कुल ट्रस्ट च्या वतीने १९ सप्टेंबर रोजी बोरमलनाथ मंदिर,बोरीपार्धी येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन

## आ.कुल यांच्या प्रयत्नातून रूग्नांना शिबिरात होणार मोफत उपचार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा व मोफत उपचार मिळावेत यासाठी दौंड तालुक्याचे आमदार राहुल दादा कुल यांच्या संकल्पनेतून व कै.सुभाष आण्णा कुल मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी,बोरमलनाथ मंदिर,बोरीपार्धी (चौफुला) येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे.

या महाआरोग्य शिबीरात पुणे जिल्ह्यातील अनेक नामांकित रुग्णालयांचा सहभाग असून विविध वैद्यकीय तपासण्या,उपचार व नियोजित शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.तरी सर्व नागरिकांनी या महाआरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे अवाहन आमदार राहुल कुल यांचे मध्यवर्ती कार्यालय केडगाव यांनी केले आहे.




अधिक माहितीसाठी - आमदार ड.राहुल कुल यांचे मध्यवर्ती संपर्क कार्यालय - ७०३८ ६६ ७७ ९९या नंबर वरती संपर्क करावा असे अवाहन करण्यात आले आहे.

# सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नवीन सोयाबीनला सुरुवात शेतकऱ्यांना मिळाला ५०११ रुपये भाव



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दिनांक १४ सप्टेंबर रोजी शेतकरी सचिन कबाडी रा वाढोणा यांनी नवीन सोयाबीन विक्रीला आणली असता त्यांच्या सोयाबीनला पाच हजार अकरा रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला असून सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथे नवीन सोयाबीन विक्री आणली असता अश्विनी ट्रेडिंग कंपनी यांच्यावतीने व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकरी सचिन कबाडी यांचा सत्कार करण्यात आला यावेळी प्रकाश आप्पा बिडकर, बाळू भाऊ तोष्णीवाल, मुकुंद भाऊ झंवर, शिवाजीराव देशमुख, काशिनाथ देशमुख, बाजीराव शिर्के, सचिन धूत, रितेश मुंदडा, कैलास बिडकर, विजू देशमुख, अक्षय बिडकर यांच्यासह अदी व्यापारी उपस्थित होते.



**भोकर तालुक्यातील प्रसिद्ध असलेले पाळज येथिल सत्य गणपतीची मारोतराव कवळे गुरुजी यांनी सहपत्निक पुजा आरती केली असता समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी उपस्थित उमरी मार्केट कमिटी संचालक बापुराव पाटील करकाळेकर,उमरी चे प्रतिष्ठित व्यापारी नरसिंगअप्पा मुक्कावार, गोविंदआप्पा नलबलवार,मोहनआप्पा उत्तरवार,पंडीतजी बेंबरे,उमाजी नादरे, श्रीनिवास पाटील ढगे, प्रल्हाद हिवराळे सह आदी उपस्थित होते.**

# जि.प.प्रा.शा.जांभरुण बु.ता.सेनगाव जि.हिंगोली येथे मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळाजिल्हास्तरीय मूल्यमापन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत तालुकास्तरावर जांभरून (बु )शाळेचा प्रथम क्र, दिनांक १४/०९/२०२४ रोजी जिल्हास्तरीय मूल्यमापन पथक प्रमुख तथा शिक्षणाधिकारी (प्रा. ) श्री. संदीपकुमार सोनटक्के, यांच्या नेतृत्वात डायट हिंगोली चे अधिव्याख्याता श्री. सुखदेव देठे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.सुरेश सोनुने , केंद्रप्रमुख श्री. रघुनाथ काळे यांच्या जिल्हास्तरीय भेट जांभरुण( बु. )येथे देऊन मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अंतर्गत विविध निकषांच्या आधारे काटेकोर पाहणी केली. तसेच गुणवत्तेच्या अनुषंगाने विद्यार्थी अध्ययन स्तर व अध्ययन निष्पत्ती यांची काटेकोर विद्यार्थी निहाय तपासणी करण्यात आली

सर्वप्रथम शाळेतील विद्यार्थिनींनी पथक प्रमुखांचे औक्षण करून स्वागत के,ले शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी स्काऊट पथकाने शाळेच्या दर्शनी भागात फुलांची सजावट करून शालेय बँड यांनी बँड च्या गजरात, रांगोळी काढून पथकाचे स्वागत केले.

त्यानंतर

शाळेतील पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी व शैक्षणिक संपादनूक (अ, ब, क) या तिन्ही भागातील निकषांची पाहणी करण्यात आली. पायाभूत सुविधांमध्ये वर्ग खोल्या, ग्रंथालय, मुख्याध्यापक खोली,आरोग्यसेवा, हँडवॉश स्टेशन शालेय फर्निचर, आयसीटी सुविधा क्रीडांगण शौचालय, वर्ग सजावट, परसबाग, विद्यार्थी लाभाच्या योजना जनजागृती शिक्षक माहिती, शासन ध्येय धोरण, अंमलबजावणी



मध्ये सरल प्रणाली, आधार वैधता, यु-डायस प्रणाली वरील अद्यावत नोंदी तंबाखूमुक्त शाळा, स्काऊट गाईड, विद्यांजली पोर्टल नोंदणी व मागणी नोंद, चजजउ प्रमाणपत्र, स्वयं पोर्टल नोंदणी, महावाचन अभियान, नवभारत साक्षरता अभियान, शैक्षणिक संपादनुकीमध्ये विषयनिहाय विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर व अध्ययन निष्पत्ती संपादनूक, वाचन लेखन व गणिती क्रियांची क्षमता, क्रीडा स्पर्धा सहभाग, विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभ, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, डिजिटल वर्गखोली, आय सी टी संगणक लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, परसबाग या अनुषंगाने परिपूर्ण पाहणी करण्यात आली.

पथक प्रमुखांनी शाळेतील विविध उपक्रम यांच्या अंमलबजावणीचे फोटो, व्हिडिओ पाहून अभिनंदन केले.

अनाथ विद्यार्थी, एकल पालक विद्यार्थी यांना महिला व बालकल्याण विभागाची बाल संगोपन भत्ता तसेच दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती , मदतनीस भत्ता पाठपुरावा करून मिळवून दिल्याबद्दल विशेष अभिनंदन केले. उज्वल शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

केंद्रप्रमुख श्री. रघुनाथ काळे सर, मुख्याध्यापक श्री धाबे सर, ज्येष्ठ शिक्षक श्री राऊत सर, श्री. व्ही. एन. टाले,श्री. डी. एस. खनपटे, श्री पी. व्ही. हलगे व शिकाऊ प्रशिक्षणार्थी श्रीम. रंजना रोडगे, शा. पो. आ. कर्मचारी शिवाजी रोडगे, शिक्षण प्रेमी श्री. भागवत रोडगे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# दक्षिण भारतीय मध्य रेल्वे सल्लागार समितीच्या सदस्यपदी संतोष रायकर यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

केंद्रीय मध्य रेल्वे च्या पुणे विभागीय प्रवासी सल्लागार समिती (ऊ्छणउउ ) सदस्य पदी श्री संतोष पांडुरंग रायकर यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे



केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच मा खासदार सुजय दादा विखे पाटील यांच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आली असून

ही निवड रेल्वे प्रवाशांच्या प्रश्न सोडवण्यासाठी तसेच त्या विभागातील रेल्वे स्थानकांचे परिसरातील विकास साधण्यासाठी या निवड करण्यात आली आहे अहमदनगर ते दौंड या महामार्गावरील रेल्वे प्रवाशांचे प्रश्न प्रामुख्याने सोडवण्यात येतील तसेच लोकल चालू करण्यासंदर्भात पाठपुरावा करू असे निवडीनंतर असे संतोष रायकर यांनी सांगितले आहे

त्या निवडीच्या मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे.संतोष रायकर हे २४ वर्ष भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते असून सध्या ते भाजपा ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या निवडीचे स्वागत डॉ.सुजय दादा विखे पाटील. आमदार बबनरावजी दादा पाचपुते . आमदार राम शिंदे साहेब भाजपा जिल्हाध्यक्ष श्री दिलीप भालसिंग इत्यादी नी स्वागत केले आहे..

# विठ्ठल धाकतोडे यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाल्याने



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील सुकळी गावचे रहिवाशी असलेले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष विठ्ठल धाकतोडे यांना यशवंत संघर्ष सेना यांच्याकडून सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाल्याने सेनगाव येथे विठ्ठल धाकतोडे यांचा भव्य सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात दिल्या यावेळी मा, नगरसेवक अजेय विटकरे, नगरसेवक अमोल तिडके, डायरेक्टर अंकुश तिडके, पत्रकार महादेव हरण, सरपंच वसंतराव अवचार, सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल देशमुख, मनोज हजारे, आकाश हरण,व आदींनी त्यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,

# जय वाल्मिकी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे अटकळी येथील जय वाल्मिकी गणेश मंडळ यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध संस्कृतीक उपक्रमशिल कार्यक्रम आयोजित केल्या जातात त्या अनुषंगाने दि.१४ सप्टेंबर रोजी ठिक सकाळी ११ ते ३ यावेत ४५ तरुणांनी रक्तदान करुन तालुक्यात एक आदर्श निर्माण केला आहे नांदेड येथील शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथील डॉक्टर ऋषीकेश घोडके, डॉक्टर शरद औचार, सूरनर प्रकाश , अतुल ताकसाळै, राजू औराळे, सय्यद बशीर यांनी सर्व टिम अटकळी येथे येऊन रक्तदान शिबीर संपन्न केले

यावेळी विठ्ठल पोलकमवाड ग्रामपंचायत सदस्य, राजेश पोलकमवाड ,संतोष पोलकमवाड, संतोष मेहत्री, संतोष चिंतावार, गंदेवार संतोष पोलकमवाड, दौलत चव्हाण, बालाजी पोलकमवाड, कैलास पोलकमवाड, नामदेव पोलकमवाड, बालाजी पोलकमवाड,आदी मंडळाचे पदाधिकारी शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# अवैध धंद्याची बातमी का? छापली म्हणत पत्रकार दयानंद सोनवणे यांच्या वर हल्ला

## अवैध धंदे करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ कारवाई करा पाटोद्यात पत्रकार आक्रमक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षेत्रातील अवैध दारु विक्री, सपोर्ट, पत्त्यांचा क्लब, मटका आदी अवैध धंद्याची बातमी दैनिक लोकनायक चे पत्रकार दयानंद सोनवणे यांनी दैनिक लोकनायक च्या दिनांक ०९ सप्टेंबर च्या अंकात छापली होती. या अवैध धंद्याची झळ तरुणाईला व महिला वर्गाला बसत आहे. तरुणाई व्यसनाधीन व जुगारी होत आहे तसेच उसतोडणी मजुरांची आगाऊ उचलही या व्यसनात जात आहे. ही सामाजिक भावना लक्षात घेऊन अंमळनेर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. याचा राग धरुन पोलीसांचा हफ्ता गोळा करणारा एजंट व अवैध दारु विक्री व पत्त्याचा जुगार सर्रासपणे चालवणारे तुकाराम आतकरे व अशोक वाल्हेकर यांनी रात्री डोंगरकिन्ही ते मिसाळवाडी रोडवर गाठुन अश्लिल भाषेत शिविगाळ करुन खाली पाडुन लाथा बुक्यांनी जबर मारहाण केली, यात पत्रकार दयानंद सोनवणे हे गंभीर जखमी



झाले आहेत. याची तक्रार अंमळनेर पोलिसांत दिली आहे. या अवैध धंदे चालकास पोलीसांचे अभय असुन त्याला वाचवण्यासाठी पोलिसांनी त्याला बोलावून घेऊन उलट पत्रकारावरच पैसे मागतो असा आरोप करुन गुन्हा नोंद केला आहे. हा प्रकार पत्रकारीतेला धोकादायक आहे. अवैध धंद्याची बातमी छापल्यामुळे पत्रकाराला मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली जाते मात्र पोलिसांनी अद्यापही काही कार्यवाही केली नाही. या निषेधार्थ पाटोदा तालुका पत्रकार बांधवांनी तहसीलदार तसेच डी वाय एस पी यांना निवेदन देऊन निषेध नोंदला आहे.

निवेदनात अशी मागणी केली आहे की भ्याड हल्ला करणाऱ्या आरोपींना कठोर शासन करावे व दयानंद सोनवणे यांच्या वर नोद झालेला खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा, नसता तिव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा पाटोदा तालुक्यातील पत्रकार बांधवांनी दिला आहे.

या वेळी सय्यद सज्जाद, हमीदखान पठाण, गणेश शेवाळे, सोमनाथ खंडागळे, अजय जोशी, प्रदीप उबाळे, राम तांबे, हारिदास शेलार, शेख जावेद भाई, संजय सानप, पवनकुमार भोकरे, अ.कादर मकराणी, अशोक भवर, सचिन शिंदे, आमिर शेख, सय्यद फय्याज भाई, विजय जोशी सह आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# वासुंदे येथील खडी क्रेशर मालकांना दौंड तहसीलदार यांनी काढल्या नोटीस

## खडी क्रेशर प्लांटमुळे अतिउच्च विज वाहिनीलाही धोका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

वासुंदे ता.दौंड येथील खडी क्रेशरच्या मालकांना दौंड चे तहसीलदार अरुण शेलार यांनी महसूल अधिनियमांच्या अटी शर्तींचे पालन न केल्यामुळे संबंधित खडी क्रेशर मालकांना नोटीस काढून खुलासा मागीतला आहे.रॉयल्टी पेक्षा अधिक उत्खनन करणे,सार्वजनिक मालमत्तेला धोका निर्माण करणे,क्षमते पेक्षा अधिक खोल उत्खनन करणे,धुळीचे नियोजन न करणे,असे इतर अनेक अटी शर्तींचे पालन न केल्यामुळे संबंधितांना नोटीस कढण्यात आले आहे. त्यांचा खुलासा आणि गावकामगार तलाठी,नायब तहसिलदार यांच्या अहवाल आले नंतर योग्य ती कडक कारवाई करण्यात येणार आहे असे तहसिलदार शेलार यांनी सांगितले.



तसेच क्रेशर प्लांटमुळे महापारेषाण च्या अति उच्च विज वाहिनीचा मनोरा आणि २२० के,व्ही,लाईन कोसळण्याच्या मार्गावर आहे.वासुंदे येथील विज वाहीनीचा मनोरा पडल्यास अनेक गावांची विज बंद होवून शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नूकसान होणार आहे.आणि मोठी जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.परंतू आजही येथील खडी क्रेशर महापारेषांच्या २२० के,व्ही लाईन खालीच बोर ब्लास्टिंग करून उत्खनन करत खडी क्रेशर चालू असताना पाहायला मिळत आहे.या ठिकाणी वासुंदे गावात एकूण १८ खडी क्रेशर चालू असून गावातून दररोज सुमारे एक हजार ते बाराशे लहान मोठ्या ट्रक,हायवा गाड्या खडी,कच,डस्ट,ईत्यादी वाहतूक करून विक्री करत लाखो रुपयांची माया कमवत आहेत.ऐवढ्या मोठ्या प्रमाणात शासनाच्या काळ्या सोन्याची लूट दिवसा ढवळ्या होत असताना प्रशासन मात्र स्वुस्त झालेले पाहायला मिळत आहे.येथील महापारेषांनच्या २२० के,व्ही टॉवर लाईन (मनोऱ्याखाली) सुरू असलेला खडी क्रशरचा महाप्रतापी उद्योग,आज रोजीही चालूच आहे हे देखील नवलच म्हणावे लागेल.

# दानापूर येथे भारतीय डाक विभागामार्फत डाक चौपालकार्यक्रमास नागरिकांचा उदंड प्रतिसाद

## ग्रामीण भागातील लोकांसाठी पोस्टातील कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा-एन.जी.तोडकर साहेब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे भारत सरकार यांचे मार्फत आपल्या दानापूर गावामध्ये दिनांक १४ ९ २०१९ या रोजी डाक चौपाल स्थळ ग्रामपंचायत कार्यालय दानापूर येथे ठीक आठ वाजता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते ग्रामीण भागातील लोकांसाठी पोस्टातील कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा श्री एन जी तोडकर साहेब इन्स्पेक्टर ऑफ पोस्ट सिल्लोड सब डिव्हिजन व श्री राहुल तेलंग्रे पोस्ट मास्टर दानापूर पोस्ट ऑफिस यांनी या विविध योजना संदर्भात ग्रामस्थांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राबवण्यात आली याकरिता खात्याची आवश्यकता होती तर दानापूर पोस्ट ऑफिस मध्ये संबंधित



अधिकाऱ्यांनी लाडक्या बहिणींचे ताबडतोब खाते उघडून दिले व मोबाईल आधार लिंक केवायसी व मुलींचे आधार कार्ड काढून दिले या योजनांमध्ये १. लेक लाडकी योजना २. मुख्यमंत्री लाडकी सुकन्या समृद्धी योजना, महिला सन्मान बचत पत्र योजना, बाल आधार सेवा, श्री एन जी तोडकर साहेब, राहुल तेलंग्रे साहेब, कैलास गवळी साहेब, पुष्पा ठाकूर कर -इझच्, राहील पठाण इझच्, अंकिता कापुरे इझच्, पूजा घोडके इझच्, यांनी ग्रामस्थांना सखोल मार्गदर्शन केले.

# १०क्विंटल ८० किलो गुलाल जप्त;साखरखेर्डा पोलीसांची कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

बुलढाणा जिल्हाधिकारी यांनी रासायनिक गुलालाचे उत्पादन व विक्री तसेच साठवणूक वापर करण्यास कायमस्वरूपी बंदी घातल्यामुळे,व नैसर्गिक घटकापासून बनवलेला हर्बल गुलालाचा वापर करण्यात यावा असा आदेश दिल्यामुळे सदर अनेक ठिकाणी आदेशाची अंमलबजावणी करायला सुरुवात झाली आहे साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन करेवाड यांनी कठोर अंमलबजावणी करून दिनांक १३ सप्टेंबर रोजी साखरखेर्डा येथील किराणा व्यवसायिकांना गुलाल संदर्भामध्ये नोटीस बजावली होती,त्यानंतर दि १४ सप्टेंबर रोजी साखरखेडा ठाणेदार करेवाड त्याचबरोबर मंडळ अधिकारी रघुनाथ साळुंखे,,तलाठी लखन राजपूत,कोतवाल शुभम खरात वैभव सुधाकर तुपकर, हे सकाळी किराणा दुकानात झाडाझडती घेण्याकरता गेले होते



अगोदर बालाजी किराणा दुकानांमध्ये गेले असते त्या ठिकाणी गुलाल आढळला नाही त्यानंतर बार जवळील आशिष किराणा दुकानात गेले असता त्या ठिकाणी १९ बॅगा आढळून आल्या त्या बॅगावर रॉक सॉल्ट नाव आढळून आले,सदर गुलाल हातावर घेऊन बोटाला पाणी लावून चोळून पाहिला असता त्या मुलाला मध्ये रासायनिक रंग तसेच बारीक रांगोळी सारखी चुरी आढळून आली,तब्बल दहा क्विंटल ८० किलो गुलाल पंच सक्षम जप्त करण्यात आला असून,साखरखेर्डा पोलिसांनी अपरा नंबर २३३ / २०२४ वीएन एस कायदा कलम २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे,सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे अप्पर पोलीस अधीक्षक बी महामुनी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साखरखेर्डा ठाणेदार गजानन करेवाड सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद पारडकर,,बुलढाणा नियंत्रण कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक ए . डी . धोपडे,शुभम वरदाडे पोलीस शिपाई,पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन राजे जाधव पोलीस हेडकॉन्स्टेबल बाजीराव खरात चालक पोलीस कॉन्स्टेबल वाहक चालक पोलीस कॉन्स्टेबल मेहेर पोकाँ कांबळे,ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर चनखोरे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी कारवाई पथकामध्ये समावेश होता .

# एक सण- एक वृक्ष,आणि एक पेड माँ के नाम या उपक्रमामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## नगराध्यक्ष जिया बेग आणि मुख्याधिकारी ऋतुजा पाटील यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

माझी वसुंधरा अभियान आणि स्वच्छता हीच सेवा २०२४ या अभियाना अंतर्गत श्रीगणेशोत्सव आणि ईद-ए -मिलाद या पवित्र कालावधीतील पर्वा वर आष्टी नगरपंचायत कार्यालयाच्या वतीने आष्टी शहरांमध्ये स्वच्छता हीच सेवा,एक सण-एक वृक्ष आणि एक पेड माँ के नाम हे उपक्रम सुरू करण्यात आले असून आष्टी शहरातील पर्यावरण संवर्धन करून आष्टीतील नागरिकांचे जीवन अधिक सुंदर बनवण्यासाठी या उपक्रमामध्ये आष्टी शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग आणि नव्याने पदभार स्वीकारलेल्या मुख्य अधिकारी ऋतुजा पाटील यांनी केले आहे.

आष्टी नगरपंचायत प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी याबाबत माहिती दिली याबाबत अधिक माहिती देताना मुख्य अधिकारी ऋतुजा पाटील म्हणाल्या की आष्टी नगरपंचायत च्या वतीने वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात येणार आहे दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी नगराध्यक्ष जिया बेग आणि आपल्या वतीने आष्टी शहरातील पेठ गणेश मंडळासह पाच प्रतिनिधिक स्वरूपामध्ये गणेश मंडळांना प्रत्येकी पाच वृक्ष लागवडीसाठी सप्रेम भेट देण्यात आले असून या गणेश मंडळांनी त्याची संवर्धन करावे अशी अपेक्षा आहे त्याचबरोबर एक सण एक झाड आणि एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत श्री गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या धार्मिक परवावर प्रत्येक घरी वृक्षारोपण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात



येत आहे. शहरातील पर्यावरण समतोल राहण्यासाठी आणि निसर्गरम्य वातावरणामध्ये आनंददायी जीवन जगता यावे यासाठी उपक्रम आयोजित करण्यात आला असून आष्टीकर नागरिकांनी जास्तीत जास्त या अभियानामध्ये सहभागी होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड व्हावी असा आमचा प्रयत्न असे आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगत त्यापुढे म्हणाले की, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये स्वच्छता हीच सेवा या उपक्रमांतर्गत देखील आष्टी शहरामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा आमच्या संकल्प आहे. नागरिकांना वृक्ष लागवडीसाठी रोपांचा पुरवठा नगरपंचायत कार्यालयाद्वारे करण्यात येणार आहे. मागणीप्रमाणे त्यांना रोपे पुरवण्यात येतील असे सांगत या उपक्रमामध्ये सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.यावेळी नगराध्यक्ष जिया बेग उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,गटनेते किशोर झरेकर कार्यालयीन अधीक्षक प्रकाश हारकळ नगर अभियंता अथहर बेग,नगर अभियंता गहिनीनाथ शिरसाठ,शशांक मिसाळ,नागेश करांडे,दिलीप निकाळजे,संजय निकाळजे,गणेश कुलकर्णी,सोमनाथ साखरे,श्रीकांत भोज,श्रीकांत धोंडे,बाळू धोंडे हे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय ज्ञान परंपरेची गरज-कुलगुरु डॉ.मनोहर चासकर






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

भारतास नालंदा, तक्षशीला यासारख्या जगप्रसिध्द विद्यापीठांची परंपरा लाभलेली असून त्याद्वारे अध्यात्मिक, सांस्कृतिक, आयुर्वेदिक, योग विषयक यासारख्या विविध विषयाचे ज्ञान भांडार अभ्यासकांसाठी खुले होते. या ज्ञान परंपेरेचे महत्त्व पाश्चात्य अभ्यासकांनी देखील ओळखले असून या प्राचीन ज्ञान परंपरेची ओळख आजच्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन करून देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरु मा.डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे. दि.१३ सप्टेंबर रोजी

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथे आयोजित भारतीय ज्ञान प्रणाली या एक दिवसीय कार्यशाळेत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले विद्यार्थ्यांचे पाठांतर कमी करून त्यांच्यामध्ये बौध्दिक व आकलन क्षमता, मूल्य रुजवून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे आवाहन यावेळी मा.कुलगुरुंनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेचे विश्वस्त मा.श्री. शंतनू डोईफोडे यांनी भूषविले असून या कार्यक्रमास डॉ. प्रशांत पेशकार, व्यवस्थापन परिषद सदस्य, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, डॉ.एम.के.पाटील, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, डॉ. पराग खडके, अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा, मा. चंद्रकांत बाविस्कर आंतरविद्याशाखीय अभ्यास, यांचेसोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर, व उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावरील संपादित संदर्भग्रंथाचे प्रकाशन व अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेल्या संशोधनात्मक अहवालाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यशाळेत भारतीय ज्ञान परंपरेची ओळख व भारतीय तत्त्वज्ञान प्रणाली या उपविषयावर डॉ. उदय कुमठेकर यांनी तर भारतीय ज्ञान परंपरेतील मानवतावाद या उपविषयावर डॉ. महेश जोशी यांनी साधनव्यक्ति म्हणून आपले विचार व्यक्त केले. या कार्यशाळेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत प्राध्यापकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.साक्षी पाटील यांनी केले तर आभार डॉ. डी.एस.वाघमारे यांनी मानले.

# नायगाव विधानसभेमध्ये काँग्रेस पक्षाने लिंगायत समाजाच्या उमेदवारास उमेदवारी द्यावी

## अतुल मंगरुळे यांची पक्षश्रेष्टीकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | प्रतिनिधी**



लिंगायत समाजाच्या मतदानाचा विचार आजवर कोणत्याही राजकीय पक्षांनी केलेला नाही फक्त मतदान पुरतं वापर झालेला आहे म्हणून नायगाव विधानसभेमध्ये आगामी निवडणुकीत काँग्रेस पक्षसृष्टीने विचार करून लिंगायत समाजाना उमेदवारी द्यावी अशी मागणी युवा नेतृत्व अतुल पाटील मंगरूळे यांनी केली आहे. नायगाव विधानसभा मतदारसंघातील एकूण पार्श्वभूमी पाहता लिंगायत समाजाच मतदान निवडून येणाऱ्या उमेदवारांच्या मतपेटीत भर टाकणारी असून काँग्रेस वरिष्ठ पक्षश्रेष्ठीने लिंगायत समाजाचे एकूण मतदान पाहता व गेल्या अनेक वर्षापासून लिंगायत समाज हा काँग्रेस पक्षाच्या सोबतीने एकनिष्ठ राहिला आहे, आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत लिंगायत समाजाच्या भावना लक्षात घेऊन लिंगायत समाजाच्या सामान्य कार्यकर्त्याला नायगाव विधानसभा मतदारसंघात संधी उपलब्ध करून द्यावी अशी भावना लिंगायत समाजाचे युवा कार्यकर्ते अतुल पाटील मंगरूळे यांनी दैनिक लोकनेता प्रतिनिधीशी आपल्या भावना व्यक्त केल्या ते पुढे म्हणाले की गेली अनेक वर्षापासून स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत लिंगायत समाज हा लोकनेते कै. बळवंतराव पाटील चव्हाण यांच्यापासून ते लोकप्रिय खासदार स्व .वसंतराव चव्हाण यांच्यासोबत सदैव राहिलेला आहे व यापुढे युवा नेते भावी खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्यासोबत राहणार आहे परंतु समाजाच्या भावना लक्षात घेऊन विधानसभेसाठी लिंगायत समाजाना संधी मिळावी असेही ते म्हणाले.

# अखेर विजयस्तंभ सन्मान मोर्चाला यश






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

विजय स्तंभाच्या संबंधित विविध मागण्यांसाठी विजयस्तंभ सन्मान मोर्चा मुंबई मंत्रालयाकडे रवाना होत असताना पिंपरी चिंचवड भीमसृष्टी येथे शासनाच्या प्रतिनिधी द्वारे संपूर्ण मागण्या पूर्ण करण्याचे लेखी पत्र शासनाच्या प्रतिनिधीकडून उपविभागीय दंडाधिकारी माननीय यशवंत माने सर यांच्याद्वारे मा.सर्जेराव वाघमारे व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत देण्यात आले. १ जानेवारी २०२५ पूर्वी सर्व मागण्या व सर्व कामे पूर्ण करणार असल्याचे कळविले व तदनंतर मुंबईकडे जाणारा पायी मोर्चा स्थगित करण्यात आला. या मोर्चात हजारो भीम सैनिक व माता-भगिनी सहभागी झाल्या होत्या. कोरेगाव भीमा विजयस्तंभ सेवा संघाचे अध्यक्ष माननीय सर्जेराव भाऊ वाघमारे व इतर पदाधिकाऱ्यांनी सहभागी झालेल्या सर्व भीमसैनिकांचे व माता-भगिनींचे आभार मानले.

# केसशिल्पी कर्ज योजनेचा नाभिक बांधवांनी लाभ घ्यावा-प्रा.सोमीनाथ खंडागळे


## सलून चालकांना एक लाख रुपये बिनव्याजी कर्ज ते ही चार वर्षांसाठी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या वतीने संत सेनाजी महाराज केसशिल्पी महामंडळाच्या अंतर्गत नाभिक समाजातील सलून चालकांना थेट कर्ज योजनेच्या माध्यमातून एक लाख रुपये बिनव्याजी कर्ज चार वर्षांच्या परतफेडीवर मिळणार आहे. या कर्जाचे फॉर्म जिल्ह्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागातील संत सेनाजी महाराज केसशिल्पी महामंडळाच्या कार्यालयात उपलब्ध झाले आहेत.

जिल्ह्यातील सलून चालकांनी या बिनव्याजी कर्ज योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे माजी बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.सोमीनाथ खंडागळे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या दिनांक २५ सप्टेंबर,१९९८ रोजीच्या शासन निर्णयान्वये २३ एप्रिल,१९९९ रोजी (कंपनी अधिनियम-१९५६) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून महाराष्ट्र शासनाचा उपक्रम म्हणून कंपनी कायदा अन्वये नोंदणी करण्यात आली आहे. संत सेनाजी महाराज केसशिल्पी महामंडळाची स्थापना इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दिनांक ०५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १९/०२/२०२४ रोजी (कंपनी अधिनियम-२०१३) नाभिक समाजाकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची उपमहामंडळ म्हणून करण्यात आली आहे. या महामंडळाचे कार्यक्षेत्र सर्व ३६ जिल्हे असे आहे. तरी या योजनेचा नाभिक समाज बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे माजी बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.सोमीनाथ खंडागळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



# मा.आ.भीमराव धोंडे व धर्मादाय उपायुक्त श्री.प्र.म.चौधरी यांच्या उपस्थितीत महेश आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

मा.आ.भीमराव धोंडे व धर्मादाय उपायुक्त श्री.प्र.चौधरी यांच्या उपस्थितीत महेश आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर शुक्रवार दि.१३.०९.२०२४ रोजी संपन्न झाले या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा.आ.भीमराव धोंडे, प्रमुख पाहुणे मा.श्री.प्र.म चौधरी धर्मादाय उप आयुक्त कार्यालय बीड ,डॉ अजय दादा धोंडे,मा.श्री अरुण मुंडे अधीक्षक धर्मादाय आयुक्त कार्यालय बीड,अँड महेश वारे धर्मादाय आयुक्त कार्यालय बीड,अँड आदिनाथ जायभाय,श्रीयुत चंदनशिव सर समन्वयक यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर संपन्न झाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.चंद्रकांत गोसावी यांनी केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.प्र.म चौधरी यांनी शासनाच्या योजनांबाबत माहिती दिली यामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राज्य कामगार विमा योजना मुख्यमंत्री सहायता निधी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राष्ट्रीय उद्योग वृद्धापकाळ आरोग्य सुरक्षा कार्यक्रम या योजनेची शासन स्तरावरील अंमलबजावणी करण्यासंदर्भात रुग्णांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय मा. आ.भीमराव धोंडे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणामध्ये समाजातील गरीब रुग्ण व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या रुग्णांसाठी विविध उपाययोजना व खाजगी रुग्णालयांमध्ये आर्थिक दुर्बल दृष्ट्या रुग्णांसाठी ठेवण्यात आलेल्या राखीव




कोट्यासाठी मोठ्या मोठ्या शहरातील रुग्णालयांमध्ये आरक्षित असणाऱ्या खाजगी रुग्णालयामध्ये आर्थिक व दुर्बल दृष्ट्या रुग्णांसाठी सहाय्यता उपलब्ध करून माननीय आयुक्तांनी याबाबत पाठपुरावा करून गरीब रुग्णांसाठी आर्थिक शोषण न होता शासनाच्या योजनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी होते की नाही याची खातरजमा करून गरीब रुग्णांना त्याचा लाभ मिळवून देण्यात यावा या संदर्भात मार्गदर्शन केले व समाजातील शेवटच्या घटकांना सुद्धा या योजनेचा लाभ मिळवून रुग्णांना जास्तीत जास्त चांगले उपचार कसे करण्यात येतील त्यासंबंधी मार्गदर्शन केले याप्रसंगी संस्थेचे सहसचिव डॉ.अजय दादा धोंडे यांनी पण रुग्णांना मार्गदर्शन केले,यावेळी राजेंद्र काका धोंडे, अभय राजे धोंडे,प्रशासकीय अधिकारी डॉ.डी बी राऊत,प्रा.शिवदास विधाते,माऊली बोडखे,संजय शेंडे होते व रुग्णांची तपासणी डॉ.मोहिनी गोसावी,डॉ.राहुल काळे ,डॉ.विशाल हेंड, डॉ, अक्षता इथापे,डॉ.केतन गर्जे, रक्त व लघवी तपासणी विशाल गोरे,अमृता गरगडे,गौतम बोडखे व नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले आभार प्रदर्शन प्रा.शिवदास विधाते यांनी केले या शिबिरात २२३ रुग्णांनी मोफत ईसीजी,ब्लड शुगर,ब्लड प्रेशर आधी तपासण्या करण्यात आल्या.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904